दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५

# 'गरबा-दांडिया'वर थिरकली तरुणाई

## विवेकानंद कॉलेजमध्ये नवरंगी नवरात्री उत्सवनिमित्त गरबा-दांडिया स्पर्धा संपन्न



**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर मधील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सचेतना मंडळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्ता विद्यमाने नवरंगी नवरात्री उत्सवानिमित् गरबा-दांडिया नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेज गटातील एकूण १३ संघानी सहभाग नोंदवून बहारदार नृत्य सादरीकरण केले. या स्पर्धा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये संपन्न झाल्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ.श्रुती जोशी, डॉ.कविता तिवडे, डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी, प्रा.सनी काळे, प्रा पल्लवी देसाई, डॉ.राजश्री पाटील, प्रा गीतांजली साळुंखे, प्रा. सौ एस पी वेदांते यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ आर आर कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. सदर स्पर्धेमध्ये सिनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक सांस्कृतिक विभाग विद्यार्थी ग्रूप, व्दितीय क्रमांक नीलम पुरोहित आणि ग्रूप व तृतीय क्रमांक वृषाली पाटील आणि ग्रूप यांनी मिळविला. तर ज्युनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक बीट बेकर्स ग्रूप, व्दितीय क्रमांक गुज्जु गाईज व ग्रूप व तृतीय क्रमांक देसी गर्ल्स ग्रूप यांनी मिळविला. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिस रक्कम देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून स्टीवन पौलस व नेहा भस्मे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी केले. स्वागत प्रा.सौ शिल्पा भोसले यांनी केले. आभार डॉ ए.एस.महात यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये गरबा-दांडियावर थिरकली तरुणाई

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित नवरंगी नवरात्री उत्सवानिमित गरबा-दांडियावर तरुणाईने बहारदार सादरीकरण केले. संगीताच्या तालावर तरुणाई थिरकली.

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सचेतना मंडळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गरबा-दांडिया नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून स्टीवन पौलस व नेहा भस्मे यांनी काम पाहिले. सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शिल्पा भोसले यांनी स्वागत केले. डॉ ए. एस. महात यांनी आभार मानले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ TODAY
कोल्हापूर, मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'च्या पाच जणांची टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी विवेकानंद कॉलेजच्या अनीष सोनटक्के, भव्य शाह, आदर्श पाटील, ऋषिकेश नलवडे, समर्थ चव्हाण यांची निवड झाली.

निवड झालेल्या विवेकानंद कॉलेजचे संघाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संघावर मात करीत विजेतेपद पटकाविले.

या कामगिरीच्या जोरावर या संघातील पाच जणांची आंतरक्षेत्रिय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन, तर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विजेतेपद पटकाविलेल्या विवेकानंद कॉलेज संघास मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

पुण्य नगरी
मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५

# ‘विवेकानंद’चे तलवारबाजीत यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटरझोनल महिला व पुरुष तलवारबाजी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या तलवारबाजी संघाने चार सुवर्ण, दोन रजत व तीन कास्यपदके जिंकली. महाविद्यालयाचा संघ शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजीच्या संघामध्ये स्थान निश्चित करून गुरुनानक देव युनिव्हर्सिटी अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी पात्र ठरला.

महाविद्यालयातील श्रवण काटकर, श्रीशैल शिंदे, रितेश पोवार, श्लोका शिंदे, निकिता मुळे, सई पवार या खेळाडूंनी आपापल्या गटात यश मिळवत पदकांची कमाई केली. यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ TODAY

कोल्हापूर, मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५

# व्हॉलीबॉलमध्ये 'देवचंद' अव्वल

## माने कॉलेजवर मात : आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

**नानीबाई चिखली ता. २९ : शिवाजी विद्यापीठांतर्गत महिलांच्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेजमध्ये पार पडल्या. स्पर्धेत देवचंद कॉलेजमधील मुलींनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम क्रमांक पटकावताना प्रतिस्पर्धी कागलच्या डी. आर. माने कॉलेज संघाचा २-१ सेटनी पराभव केला. विजयी देवचंदच्या संघाची वेणुताई चव्हाण कॉलेज, कऱ्हाड येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.**



अर्जुननगर : शिवाजी विद्यापीठांतर्गत येथे झालेल्या महिलांच्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत विजेत्या देवचंद कॉलेज संघाला पारितोषिक देताना आशीष शाह, डॉ. तृप्ती शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे.

बाद पद्धतीने खेळविण्यात आलेल्या स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण आठ संघांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये देवचंद कॉलेज अर्जुननगर, डी. आर. माने कॉलेज (कागल), डीकेटीई कॉलेज (इचलकरंजी), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), डी. वाय. पाटील कॉलेज (तळसंदे), शिवराज कॉलेज (गडहिंग्लज), सीएनसीव्ही कॉलेज (कोल्हापूर), डी. वाय. पाटील कॉलेज साळोखेनगर (कोल्हापूर) हे संघ होते. उद्‍घाटनाचा सामना देवचंद कॉलेज विरुद्ध डी. के. टी. ई. इचलकरंजी यांच्यात झाला. यामध्ये देवचंदने विजयी सलामी दिली.

सामन्यांच्या पहिल्या दिवशी देवचंद कॉलेज, डी. आर. माने कॉलेज कागल, डी. वाय. पाटील कॉलेज तळसंदे, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर या चार संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर मात करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली. अंतिम सामना देवचंद कॉलेज व डी. आर. माने कॉलेज कागल यांच्यात झाला. अतिशय रोमांचक व उत्कंठापूर्ण झालेल्या या सामन्यात देवचंदने २-१ सेटने डी. आर. माने संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकावले. तृतीय क्रमांक विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरने तर चतुर्थ क्रमांक डी. वाय. पाटील कॉलेज, तळसंदे संघाने पटकावला. पंच म्हणून दीपक चव्हाण, अनिल देवडकर, महेश शेडबाळे, तेजस खांडके, रोहित खोत यांनी काम पाहिले. विजयी संघांना चषक व प्रमाणपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते केले.

### आंतरविभागीय स्पर्धा कऱ्हाडला

■ वेणुताई चव्हाण कॉलेज, कऱ्हाड येथे आंतरविभागीय महिलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धा होणार असून, या स्पर्धा ३ व ४ ऑक्टोबरला होणार आहेत. स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी होणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातून देवचंद कॉलेज, डी. आर. माने कॉलेज, विवेकानंद कॉलेज व डी. वाय. पाटील कॉलेज, तळसंदे यांचा यामध्ये समावेश असणार आहे. याशिवाय सांगली व सातारा जिल्ह्यांतील प्रत्येकी चार संघांचा सहभाग असणार आहे. या स्पर्धेतूनच पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा १२ सदस्यांचा संघ निवडला जाणार आहे.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाचे तलवारबाजी स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय महिला व पुरुष तलवारबाजी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या तलवारबाजीच्या संघाने चार सुवर्ण, दोन रौप्य व तीन ब्रॉंझ मेडल मिळवून बाजी मारली. महाविद्यालयाचा संघ शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजीच्या संघामध्ये स्थान निश्चित करून अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. यशस्वी खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन, तर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.